<u>निशाणी क्र. यू-३</u> <u>संदर्भ (औविअ) नं. १०/२०२४</u>

**<u>द्वितीय पक्षकार यांचा पुढील उलटतपास प्रथम पक्षातर्फे वकील श्री एम. व्ही. जोगळेकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>**

हे म्हणणे खरे नाही की, मी लोकमत वर्तमानपत्राचा मुख्य उपसंपादक/ वार्ताहर असल्यामुळे ते रायगड जिल्ह्यामध्ये वेळेत येतो किंवा कसे याचे काम मी पाहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, लोकमत वर्तमानपत्राचे छपाई काम अलिबाग मध्ये होत नाही. त्याचे छपाईचे काम महापे, नवी मुंबई या ठिकाणी होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या वर्तमानपत्राच्या रायगड जिल्ह्यामध्ये वितरण करणाऱ्या टिमचा सदस्य होतो. हे म्हणणे खरे आहे की, लोकमत समूह दरवर्षी दिवाळी अंक छापतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवाळी अंकाच्या वितरणाचे काम मी स्वत: पाहत असे. हे म्हणणे खरे आहे की, मी लोकमतच्या दिवाळी अंकासाठी, त्याच्या विशेष पुरवणीसाठी व वर्तमानपत्राच्या इतर विशेष पुरवणीसाठी जाहिराती गोळा करत असत. हे म्हणणे खरे नाही की, मी सन नोव्हेंबर २०२२ पासून अलिबाग कार्यालयात शाखा व्यवस्थापकाची अतिरिक्त जबाबदारी सांभाळत होतो. आता मला मी दाखल केलेल्या निशाणी क्र. यू-४ कडील कागदपत्राच्या यादीमधील अनु. क्र. ११ कडे असलेले पत्र दाखविण्यात आले. त्यामध्ये नमूद केलेली शाखा व्यवस्थापकाची अतिरिक्त जबाबदारी सांभाळत आहे हे वाक्य खरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. सी-४ कडील कागदपत्रांच्या यादीमधील पृष्ठ क्रमांक ९ ते १३, १५ ते १८, २० ते २२, २४ ते २८, २९ ते ३५, ३७ ते ४१, ४३ ते ४९, ५१ ते ५६ आणि ६९ व ७३ या पानांवर माझ्या सह्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. सी-४ कडील कागदपत्रांच्या यादीमधील पृष्ठ क्र. ५८ वरील कागदपत्रानुसार मी दि. १८/०१/२०२३ व १९/०१/ २०२३ या दिवशी त्या कागदपत्रामध्ये नमूद असलेल्या गावांचा दौरा केला होता. मी त्या गावांमध्ये वर्तमानपत्राच्या वितरणाच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे

खरे आहे की, निशाणी क्र. सी-४ कडील पृष्ठ क्र. ६२ वरील ई-मेल मी कंपनीला पाठविला होता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. सी-४ कडील पृष्ठ क्र. ५९ ते ६१ वरील बिले ही त्या दोन दिवसाच्या दौऱ्यादरम्यानची आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पृष्ठ क्र. ६३ कडील ई-मेल मी पाठवला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या ई-मेल नुसार मी अलिबाग येथे जमा झालेली रद्दी व इतर भंगार यांचे दर ठरविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी रक्कम रू ३०००/- बँक ऑफ इंडिया मध्ये भरण्यापूर्वी मला आमच्या वर्तमानपत्राचे खाते, आयएफएससी कोड व शाखा यांची माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, मी अलिबाग शाखेचा प्रमुख असल्यामुळे मला या बाबींची परिपूर्ण माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. सी-४ कडील पृष्ठ क्र. ६४ कडील मेल मध्ये मी रायगड जिल्हा प्रमुख असल्याचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पृष्ठ क्र. ७४ व ७५ मध्ये असलेले ई-मेल मी पाठविले आहेत व मला आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पृष्ठ क्र. ७६ ते ७९ वर रायगड जिल्हा परिषदेने दिलेल्या जाहिरातींसंदर्भात उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पृष्ठ क्र. ७९ वर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर माझी सही नसती तर जाहिरात प्रसिद्ध झाली नसती. पृष्ठ क्र. ७९ वरील रिलिज ऑर्डर अलिबाग शाखेने जाहिरात कळविल्या संदर्भातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, पृष्ठ क्र. ८० वरील व्हॉट्सअॅप संदेश मी पाठविलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पृष्ठ क्र. ८१ कडील नमुद केलेल्या कागदपत्रामध्ये मी राजेश भोस्तेकर यांची रजा मंजुर केलेली आहे.

माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. ४ मध्ये मी नोकरी ला लागल्यापासून बडतर्फ होईपर्यत उपसंपादक / वार्ताहर या पदावर काम करत असल्याबाबतचा मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र. ५ मध्ये मी संपादक व कंपनी व्यवस्थापन यांच्या नियंत्रणाखाली काम करत असल्याबाबत दर्शविणारी कागदपत्रे या कामी दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी ग्राहकांचे रेकॉर्ड ठेवत असे या बाबत दर्शविणारे कोणतेही कागद याकामी दाखल केलेले

नाहीत. हे मी सांगू शकत नाही की, मी अलिबाग येथे नोकरीला असताना कंपनीने अलिबाग शाखेमधील कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस अथवा दोषारोपपत्र दिले होते किंवा कसे. हे मी सांगू शकत नाही की, अलिबाग येथील कोणत्याही कर्मचाऱ्याने कोणतेही गैरवर्तन केले नाही म्हणून कंपनीला कोणाला कारणे दाखवा नोटीस देण्याची वेळ आली नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी कंपनीच्या मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांच्या सूचनेनुसार काम करत होतो हे दर्शविण्यासाठी या कामी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. मी या कामी कंपनीशी वेळोवेळी केलेले ई-मेल दाखल केलेले आहेत. मी माझ्या वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या बदल्यांविरूद्ध न्यायालयात आव्हान दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/०५/२०२२ रोजी माझे व अतुल कुलकर्णी यांचे संबंध ताणलेले होते हे दाखविण्यासाठी या कामी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला कार्यालयीन कामे म्हणजेच दुरुस्ती, विक्री इत्यादी कामासाठी मुख्य कार्यालयाकडून लेखी परवानगी घ्यावी लागत असत हे दर्शविण्यासाठी कोणतेही कागदपत्रे या कामी दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी मला पाठविलेल्या दि. १०/०८/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसीमधील मजकुर माझ्या उत्तरामध्ये नाकारलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी या कामी चुकीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृती,**

HANGE GAURAV SADASHIV

Digitally signed by HANGE GAURAV SADASHIV
Date: 2025.12.18 13:13:30 +0530

दिनांक - १६/१२/२०२५

स्थळ - अलिबाग.

**( गौ. स. हांगे )**
**न्यायाधीश**
**कामगार न्यायालय, रायगड - अलिबाग.**